# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२३/०७/२०१८

## दि.२२/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २३३/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०७/२०१८ रोजी २२/०० वा.सहवास कॉर्नर रोडवरील पद्मरेखा सोसायटी,समोर गणपती मंदिरा जवळ,कर्वेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मोपेडवरून जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील कापडी लेडीज स्लींगबॅग खेचुन बॅगेतील रोख १,०७०/- रूपये रक्कम व एक मोबाईल फोन असा एकुण २,००५ /-रू किमतीचे ऐवजासह जबरदस्तीने बॅगेसह हिसकावुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एल.एस.उकिर्डे ९८२३३००१९४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ११९/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | श्रीमती.सुरेखा ढमाले,वय-५९ वर्षे,रा.हमालनगर,मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/२०१८ रोजी सकाळी ११/४५ ते १२/३० वा.चे दरम्यान फ्लॅट क्र.९,बिल्डींग न.११, स.नं.५८०,हमालनगर,मार्केटयार्ड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,हॉल मधील कपाटातील सोन्याचे दागिने,रोख १५ हजार रूपये रक्कम व बॅंकेतील पासबुक,चेक असा एकुण ६,६८,२००/- रू किचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.धुमाळ ९९२२६०१४४४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ३११/१८,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हे.१८४,११९,३(१८१), ५(१८०) |
| **फिर्यादी** | एस.एम.पारधी, पो.हवा. चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | विपुल सिताराम धनावडे,वय-१८ वर्षे,रा.हरमान सोसा.शास्त्रीनगर,कोथरुड,पुणे(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०२/२०१८ रोजी १७/३० वा. चतु:श्रृंगी मंदीर गेट समोर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी ॲटो रिक्षासाठी थांबलेले अच्छेलाल शर्मा,पुर्ण नांव पत्ता माहित नाही. यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून, त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दराडे ९४२०६६७७८९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ४८७/१८,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,महा.पो.का.क. ३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमी. लॉ.अलायमेंट ३,७ |
| **फिर्यादी** | सोमनाथ शिंदे,वय-२५,रा.अजिंठानगर,चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | एकुण ११ इसम (अटक नाही) |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२१/०७/२०१८ रोजी २३/३० वा. बिल्डींग नं.१७ चे पार्कींग जागेत अजिंठानगर चिंचवड, पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी व नमुद इसम हे ओळखीचे असुन त्यांचे आप्पा कांबळे यांचेमध्ये वाद झाला होता. त्यावेळी फिर्यादी यांचा मावस भाऊ संतोष पवार याने त्यांचेमध्ये मध्यस्थी केली होती. त्याचा राग मनात धरुन सदर इसमांनी आपसात संगनमत करुन कार व रिक्षामध्ये येवुन गैर-कायदयाची मंडळी जमवुन,सदर ठिकाणी तीन कोयते,तलवार व नकली बंदुक हत्यारे हातात घेवुन येवुन,त्याठिकाणी उभे असलेल्या नागरीकांना हाताने मारहाण करुन,पार्किग जागेतील लावलेल्या सहा रिक्षा ,एक कार व दोन मोटार सायकल यांच्या काचा फोडुन, टाकीवर मारुन टाकी चेंबवुन वाहनांचे सुमारे ३५,०००/-रु किंचे नुकसान करुन सदर ठिकाणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. मोरे ९९२१९५२३४१

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** वाकड पो स्टे ५९०/१८,भादविक ३३६,४२७,३४, महा.पो.का.क. ३७(१)१३५

**फिर्यादी** तानाजी भोगम,सहा.पो.निरी. वाकड पोलीस स्टेशन पुणे शहर

**आरोपी** एकुण पाच इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/३० वा. जिंजर हॉटेल जवळ,भुमकर चौका जवळ,सर्व्हीस रोडवर,वाकड,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,गैर-कायदयाची मंडळी एकत्र जमवुन रोडने जाणारी एस.टी.बस नं.एमएच/२०/बीएल/३८८१ हिचे समोरील बाजुच्या काचेवर दगड मारून तीच्या काचा फोडुन नुकसान करून,बस मधील वाहक,चालक व प्रवाशी यांचे जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, सस्ते ९५२७६९८४४८

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** मुंढवा पो स्टे १७१/१८,भादविक ३५३,३४१,५०४,५०६(१)

**फिर्यादी** अभिजीत उगले,पो.ना. मुंढवा पो स्टे पुणे शहर

**आरोपी** रिकीन तुकाराम कर्णे,वय-३२,रा.तुलशीबाग कॉलनी,सहकारनगर नं.२,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०७/२०१८ रोजी ०१/०० ते ०१/३० वा.चे दरम्यान वन लॉन्स समोर एबीसी रोड मुंढवा पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसम रिकीन कर्णे याने सदर ठिकाणी त्याचे ताब्यातील कार ही रोडवर आडवी लावुन,आरडा-ओरड करुन तेथील नागरीकांशी हुज्जत घालत असताना त्यांनी फिर्यादीस सांगितले. त्यावेळी फिर्यादी हे नमुद ठिकाणी पो स्टे चे स्टाफसह गेले असता,त्याने फिर्यादी यांना धमकी देवुन,अपशब्द वापरुन,धक्का-बुक्की करून फिर्यादी हे करीत असलेल्या शासकिय कामात अडथळा निर्माण केला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. पंडीत ९६८९६ ७७५३५

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** निगडी पो स्टे ४८९/१८,भादविक ३८०,५११,४२७

**फिर्यादी** सचिन काळगे,वय-३१ वर्षे,रा.बापुजी बुवानगर,थेरगांव,पुणे

**आरोपी** अज्ञात

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०७/२०१८ रोजी पहाटे ०४/०० वा. साई उदयान समोर संभाजीनगर,चिंचवड,पुणे याठिकाणी असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे एटीएम सेंटर मध्ये

| | |
|---|---|
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने संभाजीनगर,चिंचवड,पुणे याठिकाणी बसवलेले स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे एटीएमचे एनसीआर कंपनीचे मशीनला गॅस कटरचे सहाय्याने कट करून त्यातील रोख रक्कम चोरण्याचा प्रयत्न केल्यामुळे,एटीएम मशीन मधील एकुण १०,६७,०००/- रूपये अशा एकुण २,१०५ नोटा पुर्णपणे जळुन त्याचे नुकसान होवुन,एटीएमचे एनसीआर कंपनीचे मशीन गॅस कटरने तोडल्यामुळे ती पुर्णपणे जळुन त्याचे ४,५०,०००/- रू किचे नुकसान झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोरे ९९२१९५२३४१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**